# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.02.2025** **वार:शनिवार**

1. विकसित भारताच्या उभारणीसाठी नागरिकांनी योगदान द्यावं- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
2. यंदाच्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा आर्थिक पाहणी अहवालाचा अंदाज
3. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करणार
4. मराठीतील अभिजात साहित्य पुढच्या पिढीकडे नेण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि
5. 19 वर्षाखालच्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची अंतिम फेरीत धडक; तर पुरुषांच्या क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्धच्या 20 षटकांच्या मालिकेत भारताची 3-1 अशी विजयी आघाडी

**राष्ट्रपती**

देशाच्या विकासासाठी आणि लोकांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार अत्यंत वेगवान पद्धतीनं काम करत असून 2047 पर्यंत विकसित भारताची उभारणी करण्यासाठी सर्व नागरिकांनी योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला त्यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित केलं. आपल्या भाषणात त्यांनी सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लेखाजोखा मांडला. गेल्या 10 वर्षात पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पातली तरतूद साडेपाच पटींनी वाढली; सरकारी योजनांचा सर्वाधिक लाभ वंचित, गरीब आणि आदिवासी समुदायाला होत असून शिक्षण, महिला सशक्तीकरण, मध्यमवर्ग आणि कर्मचाऱ्यांचं हित, क्रीडा क्षेत्र याकडे सरकारचं लक्ष आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. डिजिटल तंत्रज्ञानाला प्राधान्य देतानाच सायबर सुरक्षिततेसाठीही सरकारनं अनेक उपाययोजना केल्या, असं सांगून त्या म्हणाल्या.......

**भारत जैसे देश की आर्थिक उन्नति मध्यम वर्ग, मिडिल क्लास की आकांक्षाओं और उनकी पूर्ति से परिभाषित होती है। मध्यम वर्ग जितने बड़े सपने देखेगा देश उतनी ही ऊंची उड़ान भरेगा। मेरी सरकार ने मुक्त स्वर से मध्यम वर्ग के योगदान को न केवल स्वीकारा है बल्कि हर मौके पर उसे सराहा भी है। भारत में पिछले 10 साल में बने पांच लाख से ज्यादा कॉमन सर्विस सेंटर्स सरकार की दर्जनों सुविधाएं ऑनलाइन उपलब्ध करा रहे हैं। मेरी सरकार ने लोगों के जीवन पर सरकार का प्रभाव कम करने के लिए ई-गवर्नेंस को महत्व दिया है। डिजिलॉकर की व्यवस्था ने लोगों को कभी भी, कहीं भी अपने महत्वपूर्ण डॉक्यूमेंट पाने और दिखाने की सुविधा दी है। तेज़ी से डिजिटाइज़ होते हमारे समाज में आज राष्ट्रीय सुरक्षा से जुड़ा एक और महत्वपूर्ण विषय साइबर सिक्योरिटी है। डिजिटल फ्रॉड, साइबर- क्राइम और डीप फेक जैसी टेक्नॉलाजी सामाजिक, आर्थिक और राष्ट्रीय सुरक्षा के लिए चुनौती भी बनी है। इन साइबर-क्राइम को नियंत्रित करने के लिए कई कदम उठाए गए है। साइबर सुरक्षा के क्षेत्र में भी युवाओं के लिए रोज़गार की संभावनाएं हैं। मेरी सरकार साइबर सिक्योरिटी में दक्षता सुनिश्चित करने की दिशा में निरंतर कार्यरत है। इसके फलस्वरूप भारत ने ग्लोबल साइबर सिक्योरिटी इंडेक्स में टियर-1 स्टेटस प्राप्त कर लिया है।**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहात माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, ओमप्रकाश चौटाला आणि दिबंगत माजी खासदारांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आर्थिक वर्ष 2024-25 चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल लोकसभेत सादर केला. आणि नंतर कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**आर्थिक पाहणी-मुंबई**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल, 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे सादर केला. देशाचा वास्तविक सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धीदर यंदाच्या आर्थिक वर्षात 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहील असा अंदाज या आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी आणि सेवा क्षेत्राच्या पाठबळावर देशाची अर्थव्यवस्था सातत्यपूर्ण प्रगती करत असून खरिपात चांगला पाऊस झाल्यानं ग्रामीण भागातल्या मागणीत वाढ होत आहे. कारखाना क्षेत्राला मात्र देशाबाहेरुन मागणी घसरल्याचा फटका बसला आहे. वैयक्तिक उपभोगाचं प्रमाण स्थिर राहिलं, आर्थिक शिस्त आणि सेवा पुरवठ्यात वाढ या मजबूत बाबींमुळे स्थूल रुपानं आर्थिक स्थैर्य मिळालं असं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात शेतीचं योगदान पाऊण ते एक टक्क्यानं वाढणार असून कृषी क्षेत्रच आर्थिक वाढीसाठी आश्वासक असल्याचं मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही अनंत नागेश्वरन यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.

**अर्थसंकल्प**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सकाळी 11 वाजता लोकसभेत येत्या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी राज्यसभेत अर्थसंकल्प मांडतील.

**विश्वसाहित्य**

मराठीतील अभिजात साहित्य पुढच्या पिढीकडे नेण्याकरता कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. मराठी राजभाषा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते काल पुण्यात बोलत होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांचा फडणवीस यांच्या हस्ते, राज्य सरकारचा पहिला 'साहित्यभूषण' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांशी संवाद साधतान फडणवीस म्हणाले......

**भाषा ही भावना व्यक्त करण्याचं साधन असतं. ते संपर्काचं साधन असतं आणि केवळ अभिव्यक्ती नाही तर अभिव्यक्तीतून सृजन करण्याचं साधन देखील आपली भाषा असते. आणि म्हणूनच खऱ्या अर्थानं आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. हा दर्जा म्हणजे राजमान्यता आहे. ही मराठी भाषा होतीच प्राचीन भाषा ती होतीच. परंतु कुठल्याही भाषेला राजमान्यता मिळणं हे देखील महत्त्वाचं असतं.**

हे विश्व मराठी संमेलन म्हणजे पुस्तक आणि पुस्तकांचे निर्माते यांचा महाकुंभमेळा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. यापुढील संमेलने छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूरसह परदेशातही भरवण्यासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घ्यावा असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तर रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड हे कवी केशवसुतांचं जन्मगाव पुस्तकांचं गाव म्हणून विकसित करण्यात येईल असं मराठी भाषा मंत्री उदय सामंत यावेळी म्हणाले. काल या संमेलनात विविध परिसंवाद, कवी संमेलनं आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

**नायडू**

'विकसित भारतासाठी एरोस्पेस क्षेत्रातील आव्हानं' या विषयावरील दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांच्या हस्ते काल पुण्यात झालं. दी एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाने या परिषदेचं आयोजन केलं होतं.

**निवृत्ती आकाशवाणी-सिंधुदुर्ग, पुणे, सांगली**

आकाशवाणी सिंधुदुर्ग नगरी केंद्राच्या कार्यक्रम विभाग प्रमुख, सहाय्यक केंद्र संचालक सुजाता कहाळेकर या 35 वर्षांच्या सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाल्या. विविध कार्यक्रमांच्या निर्मितीतून त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. महिला विकासासंदर्भात

त्यांनी केलेल्या कार्यक्रमाबाबत 'आंम्ही उद्योगिनी प्रतिष्ठानच्या' वतीनं देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारानं त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं. पुणे आकाशवाणीवरील लेखापाल जितेंद्र कदम हे 36 वर्षांच्या सेवेनंतर तर लेखनिक ज्ञानेश्वर लोखंडे हे 33 वर्षांच्या सेवेनंतर काल निवृत्त झाले. सांगली आकाशवाणीतील सहाय्यक अभियंता सुनील घळसासी हे देखील काल सेवानिवृत्त झाले.

**राष्ट्रीय स्पर्धा**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र 32 पदकांसह चौथ्या स्थानावर आहे. यात 7 सुवर्ण, 16 रौप्य आणि 9 कास्य पदकांचा समावेश आहे. 10 मीटर एअर पिस्तुल स्पर्धेत पार्थ माने याने सुवर्ण पदक तर रुद्रांश पाटीलनं रौप्य पदक पटकावलं. सेना दलाच्या अंकुश जाधव याने या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. खो-खोमध्ये महाराष्ट्राचा पुरुष संघ अंतिम फेरीत पोहोचला आहे. जलतरणात प्रतिक्षा डांगी, रिषभ दास, अवंतिका चव्हाण, मिहीर आंब्रे यांनाही पदक मिळाली.

**क्रिकेट**

19 वर्षाखालील महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतानं अंतिम सामन्यात धडक मारली आहे. काल क्वालालंपूर इथं झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात भारतानं, इंग्लंडवर 9 गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं 113 धावा केल्या. भारतानं हे लक्ष्य 15 षटकात केवळ एका खेळाडूच्या मोबदल्यात पार केलं. अंतिम सामन्यात आता भारताची लढत दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे.

तर भारत आणि इंग्लंड पुरुष क्रिकेट संघादरम्यान सुरू असलेल्या वीस षटकांच्या मालिकेत काल पुण्यात झालेल्या सामन्यात, भारतीय संघाने इंग्लंडचा 15 धावांनी पराभव करत मालिकेत 3-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने 181 धावा केल्या. प्रारंभी भारतीय संघाची पडझड झाली, मात्र रिंकु सिंग आणि हार्दिक पांड्या यांनी अर्धशतकी खेळी करत डाव सावरला. प्रत्यूत्तरात इंग्लडला 166 धावाच करता आल्या. भारताकडून हर्षित राणा आणि रवी बिष्णोईने प्रत्येकी 3 बळी घेतले. शिवम दुबेला सामनावीर पुरस्कार जाहीर करण्यात आला. मालिकेतील 5वा आणि अंतिम सामना उद्या मुंबईत होणार आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.